PRABODHAN EDUCATION SOCIETY'S
VIDYA PRABODHINI COLLEGE OF COMMERCE, EDUCATION, COMPUTER AND MANAGEMENT, VIDYANAGAR, PARVARI, GOA.

**F.Y B. A B. Ed SEMESTER END EXAMINATION**

**April 2018 (Regular/Repeat)**

**SUB: OPTIONAL MARATHI**

SEMESTER: II **CLASS: F. Y. B. A. B. Ed. DURATION: 2 hrs. MAX. 70 MARKS**

*******************************************************************************

सूचना: १.सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे

२.उजव्या हाताकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवितात

३.प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर सुरु करावे

..........................................................................................

प्रश्न १ ला -खालील पैकी कोणत्याही ५ प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (५x३=१५)

१) 'ऐक जरा ना' या कवितेमध्ये कवयित्रीच्या घरातील वस्तू काय सांगतात?
२) 'नभात उरले' या कवितेमध्ये कवयित्री जलराशींची ओढ असणाऱ्यांना काय करावयास सांगते?
३) 'काय बाई सांगू कथा' या कवितेतील स्त्री आपल्या दुःखाचे वर्णन कसे करते?
४) 'कळून चुकली' या कवितेमध्ये कवयित्रीला प्रकाशापेक्षा अंधारच चांगला का वाटतो?
५) 'ठाऊक तुजला' या कवितेमध्ये कवयित्री आपल्या प्रियकराला काय सांगते?
६) 'सुख' या कवितेमध्ये कवयित्रीने तिच्या सुखाचे वर्णन कशा पद्धतीने केलेले आहे?

प्रश्न २ रा -खालील पैकी कोणत्याही ५ प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (५x३=१५)

१) 'थोर तुझे उपकार' या कवितेमध्ये कवींनी केलेले आईच्या मातृत्वाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.
२) 'मुलांस उपदेश' या अभंगात संत मुलांना कोणता उपदेश करतात ?
३) कवी केशवकुमारांना 'आजीचे घड्याळ' कसले चमत्कारिक आहे?असा प्रश्न का पडतो?
४) 'मराठी ग्रंथकारांस प्रार्थना' या कवितेत कवींनी मराठी भाषेची तुलना आईशी कोणत्या प्रकारे केली आहे?
५) बालकवी ठोंबरे यांनी श्रावण महिन्याचे वर्णन आपल्या 'श्रावणमास' या कवितेत कसे केले आहे?
६) 'सासरची पाठवणी' मध्ये आई मुलीला कोणत्या अलंकारांचा हव्यास करायला सांगते?

प्रश्न ३ रा- खालील पैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. (२x५=१०)

१) "ऐक जरा ना....दंडावरती हात ठेवुनी कुजबुज करते अरामखुर्ची."

२) "उभे दु:ख हे ....उभे पुढ्यांतच;स्तब्ध,स्वयंभू,पहाडापरी."

३) "सत्य सदा बोलावे सांगे गुरु आणि आपुला बाप |
खोटे भाषण करणे सज्जन म्हणतात हे महापाप ||"

प्रश्न ४ था-खालील पैकी कोणत्याही दोन कवितांवर विवेचक टिपा लिहा. (२x५=१०)

१) ओंजळ

२) नाहीस तू

३) सोबत

प्रश्न ५ वा- सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही एक) ८ गुण

१) 'ऐक जरा ना' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

किंवा

२) 'मुलांस उपदेश' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

प्रश्न ६ वा - खाली दिलेल्या कवितेवरून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. ६ गुण

" जीवन त्यांना कळले हो

मीपण ज्यांचे पक्वफळापरी सहजपणाने गळले हो

जळापरी मन निर्मल ज्यांचे गेले तेथे मिळले हो

चराचराचे होऊनी जीवन स्नेहासम पाजळले हो

सिंधुसम हृदयात जयांच्या रस सगळे आकळले हो

आपत्काली अन दीनांवर घन होऊनी जे वळले हो

दुरित जयांच्या दर्शनमात्रे मोहित होऊनी जळले हो

पुण्य जयांच्या उजवाडानेफुलले अन परिमळले हो "

१) जीवन कुणाला कळले असे कवी म्हणतात ?

२) निर्मळ मनाच्या लोकांची तुलना कवीने कुणाशी केली आहे?

३) कुणाच्या दर्शनाने दुरित जळतात असे कवी म्हणतो?

प्रश्न 7 वा - खाली दिलेल्या कवितेच्या ओळींचा सारांश लिहा. ६ गुण

" मन जहयरी जहयरी
याचं न्यारं रे तंतर
आरे इचू,साप बरा
त्याला उतारे मंतर !

मन एवढं एवढं
जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं ?
त्यात आभाय मायेना "